Historicity Research Journal
Volume 2 | Issue 4 | Dec 2015

Impact Factor : 0.4521(UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

कारूण्याचा पूर आणि स्वच्छतेचा महापूर– गाडगेबाबा

दत्तात्रय बारबोले

मराठी विभाग प्रमुख , शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

सारांश :

त्यागाचा ताजमहल ही उपमा ज्याला शोभायची, अलौकित्वाला स्पर्श करणारा परिस म्हणून ज्याला पुकारावं, कर्तृत्वाच्या कवडश्यांनी जीवनाचीच प्रयोगशाळा करणारा एक संशोधक म्हणून ज्याला संबोधावं, नावापासून रूपापर्यंत आणि आचारापासून विचारापर्यंत जगावेगळी जीवनाची वाट दाखविणारा वाटाडया म्हणून ज्याला साथ द्यावी आणि मुलखावेगळा मोक्ष न्याहाळणारा मानवतेचा पुजारी म्हणून ज्याला हाक द्यावी असं जीवन जगून अमर झालेला एक महात्मा म्हणजेच श्री. गाडगे महाराज!

प्रस्तावना:

सार्वजनिक स्वच्छता आणि विचार शुध्दता या दुहेरी मार्गांचा आश्रय घेत आपला सेवाधर्म गाडगेबाबा राबवीत होते. विचार शुध्दतेसाठी त्यांनी कीर्तनाचे माध्यम स्वीकारले होते. अडाणी नि निरक्षर समाजाला ते जीवनाचा खराखुरा अर्थ समजावून देत होते. दिवसभर काम करून रात्री मधुर आवाजाचया गोड भजनातून मनुष्य स्वभावाच्या टिपलेल्या बारकाव्यामधून देशाटनाच्या केलेल्या सूक्ष्म अवलोकनातून नि तुकोबांच्या पाठांतरीत अभंग माध्यमातून ते सकलजनांना शहाणे करीत होते. व्यवहारवादी भूमिकेतून साऱ्या समाजाला खडबडून जागे करीत होते. छोटया–छोटयां नि सोप्या सोप्या शब्दातून मोठा अर्थ सांगत होते.

‘नाम घ्या, फुका नाम घ्या फुका।
न लगे दमडी अथवा रूका।।

यासारख्या वचनातून हरिभक्तीला पेरीत होते.पण त्याचबरोबर देव दगडात नसतो, तो माणसात असतो. त्यास कोंबडी–बकरं नको असतं तर भक्तिभाव हवा असतो. हे सांगण्यासही विसरत नव्हते.

जिथं गर्दी तिथं घाण नि जिथं घाण तिथं रोगराई हे बाबांना निरीक्षणानी समजलं होतं. त्यांनी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी आपल्या विधायक कार्याला जोरदार सुरूवात केली. पंढरपूर, देहू, आळंदी, नाशिक या ठिकाणी भाविकांसाठी धर्मशाळा बांधल्या. लोकांनी या कामी भरभरून मदत केली. रस्ते तयार केले. नदीवर घाट बांधले. मंदिरे उभी केली. हे सर्व निःस्पृही वृत्तीने अखंडपणे काम सुरूच होते.

गाडगेबाबांनी शिवाशिवीच्या रोगाने ग्रस्त झालेला समाज पाहिला. या भेदभावामुळे समाज कसा किडत निघालेला आहे हे त्यांनी अनुभवले आणि म्हणून ‘भेदाभेदभाव अमंगल’ ही भावना बाबांनी जनमनात बिंबवली. तसेच कसाया हाती विकल्या जाणाऱ्या म्हाताऱ्या गुरांकडं पाहूनही त्यांच्या जिवाची तगमग होत असे. गरिबीमुळं म्हाताऱ्या बैलांना सांभाळणं शेतकऱ्याला शक्य होत नाही हेही त्यांना उमजले. म्हणूनच त्यांनी अकोला जिल्हयातील मुर्तिजापूरला एक गोरक्षण संस्था स्थापन केली. गरीब शेतकऱ्यांला मालाची किंमत ठरविण्याचा

अधिकार नाही याचीही त्यांना वस्त्रे दिली. गाडगेबाबांचे जीवन कारूण्याने ओथंबलेले एक महाकाव्य होते.

गाडगेबाबांच्या आचारात व विचारात किंचितही तफावत आढळून आली नाही. 'हुंडाबदीचा' प्रचार चालूच होता. स्वतःच्या मुलामुलीच्या लग्नाप्रसंगी होणाऱ्या खर्चाची तरतूद काय? असा प्रश्न एका नातेवाईकाने विचारला तेव्हा 'हुंडा द्यायचा नाही व घ्यायचा नाही' हे निक्षून सांगितले. त्यांच्या मुलांचे लग्न कुठलाही डामडौल न करता व कुणाचीही मदत न घेता अगदी साधेपणानं अवघ्या साडेसात रूपयामध्ये झालं.

गाडगेबाबा अडाणी माणसाला 'खटाऱ्याचा बैल' म्हणायचे. अडाणी माणसाची सर्व बाजूंनी चाललेली पिळवणूक बाबांनी पाहिली. म्हणून गरीब मुलांच्या शिक्षणासाठी शाळा उघडल्या. 'ज्ञान हेच अमृत होय' हा विचार बाबांनी लोकांच्या कानी कपाळी बिंबविला. आम जनतेनं या महात्म्याला संतृत्व दिलं होतं. त्याच्या लेखी हा संत 'भगवत' होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांसारख्या अनेकांनी तर बाबांना गुरूसारखा मान दिला. महात्मा गांधींनासुध्दा अचंबा वाटला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय कायदा मंत्री असताना त्यांना बाबांची प्रकृती चिंताजनक आहे ही वार्ता समजली. त्यावेळी दिल्लीचा कार्यक्रम ठरलेला होता पण त्यांचे पाय बाबांकडे वळले. आंबेडकरांना पाहताच बाबा उठून बसत म्हणाले, 'आपण कशाले आले? आपलं एकेक मिनिट लाख मोलाचे, आपला केवढा अधिकार!' पण यावर डॉ. आंबेडकर गलबलून बोलले. 'बाबा, आमचा अधिकार दोन दिवसाचा! पण आपला अधिकार आजरामर आहे!' असं आंबेडकरांना बाबांबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल अलोट प्रेम, म्हणूनच याच वेळी चोखामेळा धर्मशाळा डॉ. आंबेडकरांच्या स्वाधीन करून, आपली लेक भल्या घरी पडल्याचा आनंद बाबांना झाला. अन् तसाच सात्विक आनंद डॉ. आंबेडकरांच्या डोळयातही दिसत होता. जणू दोन बंधूप्रेमाची ती ठेवंती निराजनंच होती!

कर्मवीर भाऊराव पाटलांनी बाबांचे चिरस्मारक व्हावे या भावनेनं त्यांच्या कऱ्हाडच्या कॉलेजला 'सदगुरू गाडगे महाराज कॉलेज' असे नाव दिले. एवढंच नव्हे तर, पुढं एका धनिकानं लाखो रूपयांची देणगी देऊ करून कऱ्हाडच्या कॉलेजला आपल्या वडिलांचं नाव देण्यास सुचविलं. पण भाऊरावांनी निर्धारानं त्यास सुनावलं. की, 'मी एक वेळ माझ्या जन्मदात्या बापाचं नाव बदलेन, पण कऱ्हाडच्या गाडगे महाराज कॉलेजचं नाव बदलणार नाही!' भाऊरावांचे हे उद्गार म्हणजे बाबांनी केलेल्या मानवतेच्या सेवेचाचं सुगंध होय.

बाबांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण साहित्याचे जनक' म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ते अस्सल ग्रामीण भाषेतूनच कीर्तन रंगवत होते. कीर्तनाचा श्रोतासुध्दा अस्सल ग्रामीणच होता. ज्यांच्याच भाषेत ते बोलत होते. साध्या भाषेतून मोठा आशय मांडत होते. त्यांची शब्दकला ग्रामीणांच्या अत्तःकरणाचा ठाव घेत होती. उदा. 'शरीर हे एक भाडयानं घेतलेलं घोडं', 'असा कसा तुमचा देव!' घेतो दुसऱ्याचा जिव, 'राम गेले, कृष्ण गेले, पांडवही' त्याच वाटीनं गेले, ऐसे गेले कोटयानुकोटी। काय रडू एकासाठी।' वगैरे वगैरे ही त्यांची भाषा हृदयापासून निघणारी, हृदयाला भिडणारी, करूणेनं, ओथंबलेली, दयेनं पाझरणारी अन् भक्तीनं भिजलेली, सुरस आणि सोपी होती. रसाळ होती, रवाळ होती, त्यात गंगेची शांती होती, कधी समुद्राचा खळखळाटही असायचा, कधी विनोदाचा धबधबा दिसायचा, तर कधी वीरसाचा ज्वालामुखी आढळायचा. त्यात कधी संतापाची समशेर दिसायची, तर कधी नकलांची नक्षीही दिसायची. अशी ही बाबांची बोलीभाषा होती. या अर्थाने ते एक खरे ग्रामीण साहित्यकार ठरतात.

'बुडती हे जन न देखवे डोळा', 'जो जे भेटे भूता तो ते मानिजे भगवंत' या तत्वाने ते अखेरपर्यंत जगले. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी म्हटलं आहे, 'धनाची वा मनाची पर्वा न करता समाज परिवर्तनाच्या ध्यासातून आपल्या मानवधर्मी विचारांचा प्रसार श्रध्देनं व निष्ठेनं करणारे गाडगेबाबांसारखे मानवधर्मी संत आपल्या देशाला हवे आहेत!'

अशा या गाडगेबाबांचा 'परोपकार' हाच 'परमार्थ' होता. दुःखितांचे अश्रू आपल्या अश्रूंनी पुसणं हा त्यांचा धर्म होता.

'जे कां रंजले गांजले! त्यांसी म्हणे जो आपुलें।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचिं जाणावा।।'

ही बाबांची देवाविषयी धारणा होती. 'अवघाचि संसार सुखाचा करीन. आनंदे भरीन तिन्ही लोक।।' ही त्यांची जीवन प्रेरणा होती. 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' असं त्याचं सोपं तत्वज्ञान होतं. यासाठीच ते जगले, झटले, झगडले, झिजले अन् मानवतेचा दीपस्तंभ उभा करून १९ डिसेंबर १९५६ रोजी रात्रीचे १२ वाजून २० मिनिटांनी हा मानवतेचा पुजारी हरपला. एक वादळ शांत झालं. गाडगेबाबांच्या निःस्वार्थ मानवसेवेचे वर्णन करणे ही एक न संपणारी पूजा होय. गाडगेबाबा म्हणजे 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेवु कदाचन' या गीतेतील तत्वाचे सुंदर उदाहरण होय.

संदर्भ ग्रंथ

१) जी . एन. दांडेकर – श्री गाडगे महाराज , मृण्मयी प्रकाशन ,पुणे, २००४ पी . जे . गोडबोले (भाषांतर)
२) के चे मधुकर – श्री संत गाडगे महाराज , साकेत प्रकाशन , औरंगाबाद ,२००४
३) भगत रा.तु. – श्री संत गाडगे महाराज उर्फ गोधडे महाराज यांचे चरित्र , डॉ . वा . रा . कोरपे चॅरिटेबल ट्रस्ट अकोला ,१९९४
४) द. ता. भोसले – लोकोत्तर गाडगेबाबा जीवन आणि कार्य , ग्रंथाली , मुंबई ,२००७
५) वसंत जोतदार – गाडगेबाबा , अक्षर प्रकाशन , मुंबई , १९९९